अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | गुरुवार
१६.०७.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्षः ०७ | अंकः १६६ | पृष्ठेः ०६ | किंमतः ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### जिल्हा परिषदेच्या शाळांतील गणवेश निकृष्ट दर्जाचे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** - विद्यार्थ्यांच्या शालेय गणवेशाच्या गुणवत्तेत गंभीर त्रुटी आढळून आल्याचं जिल्ह्यात आढळून आल्याने प्रशासन खडबडुन जागं झालं आहे. राज्य शासनाच्या मोफत गणवेश योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आलेल्या गणवेशात त्रुटी असल्याचं आढळून आल्यानं जिल्हा परिषद प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी संबंधित मुख्याध्यापकांना याप्रकरणात कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश दली असून दोषींवर शासन नियमानुसार कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेशही दिले आहेत.

# एमपीएससी ऑनलाईन परीक्षा तातडीने लागू होणार नाही

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे निर्देश, विद्यार्थी संघटनांच्या मागणीला यश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संगणकआधारित परीक्षा पद्धतीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे.




विद्यार्थी संघटनांच्या सातत्यपूर्ण मागणीनंतर मुख्यमंत्री यांनी चझडउ अध्यक्ष विवेक भीमनवार, राज्याचे मुख्य सचिव आणि सामान्य प्रशासन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत मुख्यमंत्री म्हणाले की, भरती प्रक्रिया सुरक्षित, पारदर्शक आणि वेळेत होणे आवश्यक आहे.

मात्र, नवीन परीक्षा पद्धती लागू करताना विद्यार्थी आणि यंत्रणांना पुरेसा वेळ मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. यामुळे संगणकआधारित परीक्षा पद्धती तातडीने लागू न करता ऑगस्ट २०२७ पासून टप्प्याटप्प्याने अंमलात आणावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

तात्पर्यंत एमपीएससीच्या परीक्षा सध्याच्या प्रचलित पद्धतीनेच घेतल्या जाव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या संदर्भातील अंतिम निर्णय महाराष्ट्र लोकसेवा आयोग घेणार असून, बैठकीत मुख्यमंत्र्यांनी आयोगाच्या विविध सुधारणा उपक्रमांचेही कौतुक केले. संगणक आधारित परीक्षा प्रणाली ऑगस्ट २०२७ पासून टप्प्याटप्प्याने लागू करा एमपीएससीच्या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घ्या, अशी मागणी एमपीएससीची तयारी करर्णाया विद्यार्थ्यांनी केली होती. परिणामी आंदोलनाचा देखील इशारा दिला होता. अशातच विद्यार्थी शिष्टमंडळाने नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली होती.

यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांच्या मध्यस्थीने हि भेट घेण्यात आली होती. या बैठकीत मुख्यमंत्र्यांकडून सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यांनतर एमपीएससी ऑनलाइन परीक्षा तातडीने लागू होणार नाही.

संगणक आधारित परीक्षा प्रणाली ऑगस्ट २०२७ पासून लागू करा, असे निर्देश प्रशासन आणि विद्यार्थी संघटनांच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. ९० टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची इच्छा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो तर या विषयी बोलताना आमदार अभिमन्यू पवार म्हणाले कि, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो की त्यांनी विद्यार्थी संघटनांची भावना लक्षात घेतली. ९० टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची इच्छा होती की परीक्षा ऑफलाईन घेतली पाहिजे.

## तुकाराम मुंढेंच्या खात्याचा मोठा प्रहार

# अकोल्यात गुटख्याचा अवैध कारखाना उद्ध्वस्त, ५० लाखांचा मुद्देमाल जप्त, गुटखा माफियांचे धाबे दणाणले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अकोला** - अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यापासून राज्यातील अवैध धंद्यांविरोधात एक मोठी मोहीम छेडली आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून अकोला एमआयडीसी परिसरातील एका प्रतिबंधित गुटखा आणि पान मसाला निर्मितीच्या कारखान्यावर अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांनी संयुक्त धाड टाकली. या धडक कारवाईत तब्बल ५० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, गुटखा माफियांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

एमआयडीसीतील कारखान्यावर पोलिसांसह संयुक्त प्रहार याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अकोला एमआयडीसी क्रमांक ४ च्या परिसरात एका कारखान्यात शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याचे उत्पादन बेकायदेशीरपणे सुरू असल्याची गोपनीय माहिती प्रशासनाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे अन्न व औषध प्रशासन आणि एमआयडीसी पोलिसांनी संयुक्त सापळा रचून धाड टाकली. या कारवाईत मोठ्या प्रमाणावर तयार गुटखा, पान मसाला, कच्चा माल आणि पॅकिंगसाठी लागणारे अत्याधुनिक साहित्य व यंत्रसामग्री जप्त करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या या संपूर्ण मुद्देमालाची किंमत सुमारे ५० लाख रुपये आहे.

या बेकायदेशीर कारखान्याचा मुख्य संचालक गौरव शर्मा हा असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. या कारवाईबाबत अधिक माहिती देताना अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त देवानंद वीर यांनी सांगितले की, 'शर्माविरुद्ध केवळ गुन्हा दाखल करून न थांबता, त्याच्या संपूर्ण नेटवर्कचा बिमोड करण्यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम म्हणजेच 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्याबाबत गांभीर्याने विचार सुरू आहे.'

# पादचाऱ्याचा मृत्यू, चालकावर गुन्हा दाखल

## वरुड ते पुसला रस्त्यावरील घटना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**वरुड** - पुसला रस्त्यावरील देवते स्टाईल शोरुमसमोर एका भरधाव दुचाकीने धडक दिल्याने एका ईसमाचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. रामभाऊ अमरसिंग इरपाची असे या अपघातात मृत्यू झालेल्या ईसमाचे नाव आहे. याप्रकरणी वरुड पोलिसांनी आरोपी दुचाकी चालकाविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या १० जुलै रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास रामभाऊ इरपाची हे वरुड ते पुसला रोडवरील देवते स्टाईल शोरुमसमोरुन जात होते. याच दरम्यान आरोपी चालक अरविंद गोपीलाल कोकोडे याने आपल्या ताब्यातील बजाज पल्सर मोटारसायकल भरधाव आणि वेगाने चालवुन रामभाऊ यांना जोरदार धडक दिली.

या भीषण अपघातात गंभीर जखमी झाल्यामुळे रामभाऊ यांचा मृत्यू झाला. या घटनेप्रकरणी मृतक रामभाऊ यांचे नातेवाईक योगेश गणपती इरपाची यांचे फिर्यादीवरुन पोलिसांनी आरोपी दुचाकी चालक अरविंद कोकोडे यांच्याविरुद्ध कलम १०६ (१), १२५ (बी) आणि २८१ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास वरुड पोलीस करत आहेत.

# थकीत वीजबिले माफ : शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्र्यांची घोषणा, दिवसा मिळणार १२ तास मोफत वीज

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - शेतकऱ्यांचे ७.५ अश्वशक्तीपर्यंतचे ४८ हजार कोटींचे थकीत वीजबिल माफ केले जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केली. त्याशिवाय वर्षाच्या अखेरपर्यंत शेतकऱ्यांना दिवसा १२ तास मोफत वीज देण्याचा निर्णय घेणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पाठोपाठ शेतकऱ्यांची पाटी कोरी व्हावी आणि या पाटीवर त्याला नवा इतिहास लिहिता यावा यासाठी हा निर्णय घेण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या किसान मोर्चाच्या वतीने बुधवारी फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमधील या कार्यक्रमात फडणवीस बोलत होते. जलयुक्त शिवारमुळे शेतकरी तीन-तीन पिके घेऊ लागला आहे. पुढच्या काळात शेतकऱ्यांचे गट तयार केले तर शेतकऱ्यांना पूरक पिके घेता येतील आणि शेती हा उद्योग फायद्यात आणता येईल, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला. गोदावरी, तापी खोऱ्यांत हे पाणी यावे यासाठी वैनगंगा, नळगंगा सारख्या योजनांतून वाहून जाणारे पाणी उचलले जाईल. त्यासाठी सुमारे २४ नवी धरणे आणि १६ जुन्या धरणांची उंची वाढविली जाईल. विदर्भात एकही जिल्हा दुष्काळी राहणार नाही. याच वर्षी हे काम पूर्ण करण्यासाठी वेगवान प्रयत्न सुरू आहेत, असे मुख्यमंत्री म्हणाले आहे.

## दोन ट्रकांमध्ये इको कारचा चुराडा

# नाशिक-पेठ महामार्गावरील भीषण अपघातात चौघांचा मृत्यू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नाशिक** - नाशिक - पेठ महामार्गावर असलेल्या सावळघाट येथे झालेल्या विचित्र अपघातात चार जणांचा मृत्यू झाला. पुढील ट्रक आणि मागून आलेला ट्रक यांच्यामध्ये इको कार मधल्यामध्ये चेपली गेली.

या अपघातात एक जण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. इको कारमध्ये बसलेल्या चौघांचा या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला तर एकजण गंभीर जखमी झाला. प्राप्त माहितीनुसार, मंगळवारी (दि.१४) सायंकाळी मारुती ओमनी इको गाडी नाशिकहून पेठच्या दिशेने जात होती.

ट्रकवरील वाहनचालकाचे नियंत्रण सुटल्याने तो 'इको'वर जावून धडकला आणि पुढे असलेल्या ट्रक यांच्यामध्ये इको कार दाबली गेली. या अपघातात इको कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. मृतांमध्ये दोन पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे.






# मतदारांसाठी दिलासा! राज्यातील निवडणूक आयोगाच्या एसआयआर मोहिमेला दहा दिवसांची मुदतवाढ

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत करण्यासाठी सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण अभियानाला महाराष्ट्रात १० दिवसांची मुदतवाढ मिळण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाने डखठ प्रक्रियेचे वेळापत्रक सुधारित केले असून, मतदारांना नोंदणी, दुरुस्ती आणि हरकती नोंदवण्यासाठी अतिरिक्त




वेळ उपलब्ध करून देण्यात आला आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार डखठ अंतर्गत मतदारांच्या घराघरात जाऊन पडताळणी केली जात आहे. या प्रक्रियेद्वारे मतदार यादीतील दुबार नावे, स्थलांतरित मतदार, मृत व्यक्तींची नावे यांची तपासणी करून पात्र मतदारांची नोंद कायम ठेवण्याचा उद्देश आहे. नागरिकांना मतदार यादीतील नाव, पत्ता किंवा इतर तपशीलांमध्ये बदल करायचा असल्यास या कालावधीत अर्ज करता येणार आहे. डखठ अभियानाचे सुधारित वेळापत्रक : बीएलओ मार्फत घराघरात भेटी : ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ मतदार केंद्रांचे पुनर्रचना/व्यवस्थापन : ८ ऑगस्ट २०२६ प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध : १७ ऑगस्ट २०२६ दावे आणि हरकती दाखल करण्याचा कालावधी : १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ अंतिम मतदार यादी प्रसिद्ध : १९ ऑक्टोबर २०२६ या मुदतवाढीमुळे मतदारांना आवश्यक कागदपत्रांसह आपली माहिती तपासण्याची आणि त्रुटी दुरुस्त करण्याची संधी मिळणार आहे.

## मोशी दुर्घटना : दोन अभियंते निलंबित

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** – मोशी येथील कचरा डेपोवर घडलेल्या भीषण दुर्घटना प्रकरणी महापालिकेचे मुख्य अभियंता-१ संजय कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांना तातडीने निलंबित करण्यात आले आहे.

महापालिका आयुक्तांनी या दोन्ही अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशीचे आदेश दिले असून प्रशासनाच्या या कठोर भूमिकेमुळे महापालिका वतुर्ळात खळबळ उडाली आहे.

## कशेडी घाटात प्रचंड दरड कोसळली : मुंबई लेन १४ तास बंद

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पोलादपूर** – मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील कशेडी घाटात धामणदिवी-चोळई गावाजवळ मंगळवारी रात्री प्रचंड दरड कोसळल्याने मुंबईकडे जाणारी लेन पूर्णपणे बंद झाली. सुमारे १४ तासांनंतर बुधवारी दुपारी दरड हटविण्याचे काम सुरू करण्यात आले. मात्र, मुसळधार पावसामुळे बचावकार्याला काही काळ अडथळा निर्माण झाला.



मंगळवारी अन्नपूर्णासमोरील डोंगराचा मोठा भाग कोसळून संपूर्ण मुंबई लेन माती व दगडांच्या ढिगाऱ्याखाली गेला. दरडप्रवण क्षेत्रात सतत दगड कोसळत असल्याने कशेडी टॅप वाहतूक पोलीस व पोलादपूर पोलिसांनी परिसरात बंदोबस्त ठेवत गोव्याकडे जाणारी लेन दुहेरी करून दोन्ही दिशांची वाहतूक सुरू ठेवली.

तहसीलदार कपिल घोरपडे, प्रांताधिकारी डॉ.पोपट ओमासे आणि पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून आवश्यक उपाययोजना केल्या.

# 'माऊली... माऊली'च्या जयघोषात नीरा स्नान संपन्न

## संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे सातारा जिल्ह्यात भक्तिभावाने स्वागत

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि भावपूर्ण मानला जाणारा नीरा स्नान सोहळा बुधवारी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. 'माऊली... माऊली'च्या अखंड जयघोषात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि हजारो वारकरी-भाविकांच्या उपस्थितीत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांना नीरा नदीच्या पवित्र पात्रात स्नान घालण्यात आले. या मंगल सोहळ्यानंतर पालखीने पुणे जिल्ह्याचा निरोप घेत सातारा जिल्ह्यात मोठ्या भक्तिभावाने प्रवेश केला.

नीरा नदीतील या पारंपरिक स्नानाला विशेष धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. पालखी सोहळ्याचा अर्धा प्रवास पूर्ण झाल्यानंतर तसेच सोहळ्याचे प्रवर्तक हैबतबाबांच्या जन्मभूमी असलेल्या सातारा जिल्ह्यात प्रवेश करण्यापूर्वी पादुकांना स्नान घालण्याची परंपरा अनेक वर्षांपासून जपली जात आहे. आळंदी देवस्थानचे मुख्य विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, सोहळा प्रमुख भावार्थ देखणे आणि अन्य मानकऱ्यांच्या उपस्थितीत दत्त घाटावर विधीवत पादुकांचे स्नान पार पडले. यावेळी स्थानिक महिलांनी मंदिरासमोर फुगड्या खेळत आपला आनंद व्यक्त केला, तर हजारो भाविकांनी नदीच्या दोन्ही तीरांवर गर्दी करून या पवित्र सोहळ्याचे दर्शन घेतले.

पालखी मार्गावर वारकऱ्यांच्या स्वागतासाठी ठिकठिकाणी आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. भाविकांकडून फुलांची उधळण करण्यात आली. जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर, तात्पुरती आरोग्य केंद्रे, रुग्णवाहिका, स्वच्छतागृहे आणि विश्रांतीची चोख व्यवस्था केली आहे. तसेच विविध सामाजिक संस्था आणि ग्रामस्थांनी फराळ, पिण्याचे पाणी व वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिली. वाहतूक सुरळीत राहावी यासाठी संपूर्ण पालखी मार्गावर कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

माऊलींचे औपचारिक स्वागत पालखीचे सातारा जिल्ह्यात आगमन होताच नीरा पुलावर जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या वतीने माऊलींचे औपचारिक स्वागत करण्यात आले. याप्रसंगी जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन तसेच पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे उपस्थित होते. पोलीस बँडच्या सुरेल वादनाने स्वागत सोहळ्याची शोभा अधिकच खुलली.

**तीन प्रमुख मंत्र्यांची एकाच व्यासपीठावर उपस्थिती**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील यावेळी साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी माऊलींचे दर्शन घेऊन पुष्पहार अर्पण केला. तीन प्रमुख मंत्र्यांची एकाच व्यासपीठावरील उपस्थितीही चर्चेचा विषय ठरली. मात्र, या राजकीय चर्चांपेक्षा 'माऊली'च्या नामस्मरणात तल्लीन झालेल्या वारकऱ्यांसाठी हा दिवस भक्ती, समता आणि अध्यात्माचा अविस्मरणीय उत्सव ठरला. नीरा स्नान सोहळ्यानंतर संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी सातारा जिल्ह्यातील लोणंद येथील मुक्कामाच्या दिशेने मार्गस्थ झाली.

# घरात डॉक्टर पतीचा मृतदेह, ८ वर्षांचा मुलगा रक्तबंबाळ

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**धारवाड** – देशभरात घडणाऱ्या खून आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. अशातच कर्नाटकच्या धारवाड शहरातून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. शहरातील एका अपार्टमेंटमध्ये राहणारे भूलतज्ज्ञ डॉ.किरण होन्नावर यांचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह आढळून आला, तर त्यांचा अवघा ८ वर्षांचा मुलगा गंभीर जखमी अवस्थेत सापडला. या प्रकरणात पोलिसांनी मृत डॉक्टरांच्या पत्नीला चौकशीसाठी ताब्यात घेतलं असून संपूर्ण घटनेचा तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डॉ.किरण होन्नावर (वय ४५) हे धारवाडमधील पवन हायस्कूलसमोरील एका अपार्टमेंटच्या सहाव्या मजल्यावर पत्नी डॉ. प्रियंका कट्टनहल्ली आणि मुलासोबत राहत होते. डॉ. किरण हे खासगी रुग्णालयात (झीर्ळींरींश केींळिींरश्र) भूलतज्ज्ञ म्हणून कार्यरत होते, तर




त्यांची पत्नी डॉ.प्रियंका या नेत्ररोगतज्ज्ञ असून त्यांनी ऑफ्थॅल्मॉलॉजी मध्ये एमएस पदवी प्राप्त केली आहे. फोनवर उडवाउडवीची उत्तरं; नातेवाईकांचा संशय वाढला पोलीस आयुक्त एन. शशिकुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी डॉ.किरण यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न त्यांच्या नातेवाईकांनी आणि मित्रांनी केला. मात्र त्यांचा मोबाईल पत्नी प्रियंका यांनी उचलला.



**वरुड :** पुसला पंचायत समिती सर्कलचे माजी सदस्य राजेंद्र केदार यांच्या निवासस्थानी आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी जावुन त्यांचा वाढदिवस साजरा केला. याप्रसंगी त्यांचे कुटूंबिय आणि इतर उपस्थित होते.

# 'कच्छी समाजाशी नातं हे कुटुंबासारखंच' : ठाण्याच्या विकासासाठी शासन कटिबद्ध - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**ठाणे** – कच्छी अस्मिता मंचतर्फे आयोजित 'कच्छी पगडी कोणशिरे' या गौरव सोहळ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कच्छी समाजाशी असलेले आपले जिव्हाळ्याचे आणि कौटुंबिक नाते अधोरेखित करत ठाण्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणारा हा उपक्रम गेली १९ वर्षे सातत्याने सुरू असून, प्रत्येक वर्षी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे भाग्य लाभल्याचे त्यांनी सांगितले.

'ज्या भावनेने आपण घरातील कार्यक्रमाला उपस्थित




राहतो, त्याच भावनेतून मी या कार्यक्रमाला दरवर्षी येतो. समाजातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा सन्मान केल्याने इतरांनाही प्रेरणा मिळते आणि समाजाचा विकास अधिक वेगाने होतो,' असे शिंदे म्हणाले. यावेळी पुरस्कारासाठी निवड झालेल्या एका ४० वर्षीय तरुणाच्या हृदयविकाराच्या झटक्याने झालेल्या निधनाबद्दल त्यांनी शोक व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली

'सुरेश गडा हे धर्मवीर आनंद दिघे यांचे खरे शिवसैनिक' : कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक सुरेश गडा यांच्या समाजसेवेचे कौतुक करताना शिंदे म्हणाले, 'धर्मवीर आनंद दिघे यांचे निष्ठावान शिवसैनिक म्हणून सुरेश गडा यांचे नाव कायम आदराने घेतले जाईल.' त्यांनी हिंदीतही भावना व्यक्त करत, 'चालीस साल से शिवसेना के साथ खड़ा, उसका नाम है सुरेश गडा,' असे गौरवोद्गार काढले. आषाढी बीजच्या शुभेच्छा : आषाढी बीज हा कच्छी समाजाचा नववर्षाचा सण असल्याचे सांगत उपमुख्यमंत्र्यांनी सर्व समाजबांधवांना शुभेच्छा दिल्या. ठाण्यात विकासकामांचा वेग वाढणार : ठाण्यात सुरू असलेल्या विकासकामांची माहिती देताना शिंदे यांनी मेट्रो, अंतर्गत मेट्रो, कोस्टल रोड, डबल डेकर रस्ते आणि इतर महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे शहराचा चेहरामोहरा बदलत असल्याचे सांगितले.

## अमरावती जिल्हा महानुभाव परिषदेच्या कार्यकारीणी जाहीर

# अध्यक्षपदी प.पू.प.महंत गोपीराज बाबा यांची वर्णी

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – अखिल भारतीय महानुभाव परिषद अंतर्गत अमरावती जिल्हा महानुभाव परिषदेच्या अध्यक्षपदी प.पू.प.महंत गोपीराज बाबा (नवे) यांची निवड करण्यात आली.



या प्रसंगी त्यांनी नुतन कार्यकारणी जाहीर केली. त्यामध्ये उपाध्यक्ष प.पू.प.तळेगावकर बाबा, प.पू.प.महंत वैरागी बाबा तसेच वासनिकांमधून उपाध्यक्ष विनय चौधरी वरुड, विनोद खेरडे धोतरखेडा, सचिव प.पू.प.महंत परसराज बाबा कारंजेकर व सदस्य म्हणुन वरुड तालुक्यातून नरेंद्र पावडे, उज्वल डहाके, सतीश देशमुख, बाबाराव खाडे, विलास फांदडे, अशोक भेले, प्रदीप पुंड यांची सर्वानुमते सदस्यपदी निवड करण्यात आली.

यावेळी अमरावती जिल्ह्याचे संघटक, महामंत्री, कोषाध्यक्ष मावंदे यांची सुद्धा निवड करण्यात आली. ही सभा श्री क्षेत्र रिद्धपूर येथे परमपूज्य परम महंत दर्यापूरकर बाबा यांचे अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली. यावेळी महानुभाव परिषदेची अमरावती जिल्हाकरिता ११६ सदस्यांची कार्यकारीणी तयार करण्यात आली तसेच १२ सप्टेंबरला येणाऱ्या श्री चक्रधर स्वामी अवतार दिन संपन्न करण्यावर विचार करुन अवतार दिन रिद्धपूर येथे संपन्न करण्याचे ठरविण्यात आले. या सभेमध्ये परिषदेचे भरीव कार्य व संघटन तसेच पंथ वाढीसाठी उपस्थित सर्वांनी नियोजन करुन सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. येणाऱ्या १२ सप्टेंबरला सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा अष्टशताब्दी अवतार दिन संपन्न करण्याविषयी चर्चा करण्यात आली व २६ व २७ सप्टेंबरला२०२६ ला श्री क्षेत्र परमेश्वरपूर(रिद्धपूर) येथे सर्वानुमते भव्यदिव्य स्वरुपात अष्ट शताब्दी महोत्सव साजरा करण्याचे ठरविण्यात आले.

या सभेला जिल्हाभरातून संत, महंत, तपस्विनी, उपदेशी वासनिक सदभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनियुक्त अध्यक्ष श्री महंत गोपीराज बाबा यांनी सर्वांना भोजन देऊन सभेची सांगता झाली.

# संपादकीय

**{ विचारांना कृतीची जोड मिळाली की यश नक्कीच मिळते. }**

## मोशी दुर्घटना : भ्रष्टाचाराची किंमत कामगारांच्या जीवावर

पुण्यातील मोशी येथील कचरा डेपोमध्ये घडलेली भीषण दुर्घटना ही केवळ नैसर्गिक आपत्ती नसून प्रशासकीय हलगर्जी, भ्रष्टाचार आणि नियोजनशून्य कारभाराचा थेट परिणाम आहे. मुसळधार पावसामुळे कचऱ्याचा अवाढव्य डोंगर खचून 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या इमारतीवर कोसळला आणि त्यात आठ निष्पाप कामगारांना आपला जीव गमवावा लागला. अनेक जण जखमी झाले. या घटनेने प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे आणि भ्रष्ट व्यवस्थेचे विदारक वास्तव पुन्हा एकदा समाजासमोर आणले आहे. प्रश्न केवळ एका दुर्घटनेचा नाही, तर अशा दुर्घटना टाळण्यासाठी असलेली संपूर्ण यंत्रणा अपयशी ठरल्याचा आहे. भारतामध्ये शहरीकरण झपाट्याने वाढत आहे. शहरांचा विस्तार होत असताना कचरा व्यवस्थापन ही मोठी समस्या बनली आहे. पुणे महानगरपालिका दररोज हजारो टन कचरा संकलित करते. या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी 'वेस्ट टू एनर्जी'सारखे प्रकल्प उभारण्यात येतात. अशा प्रकल्पांचा उद्देश कचऱ्यापासून ऊर्जा निर्माण करून पर्यावरणाचे रक्षण करणे हा असतो. परंतु या प्रकल्पांची उभारणी नियमबाह्य पद्धतीने, निकृष्ट दर्जाच्या कामातून किंवा आवश्यक परवानग्या न घेता होत असेल, तर ते विकासाचे नव्हे तर विनाशाचे केंद्र ठरतात. मोशीतील दुर्घटनेतही असेच चित्र दिसून आले आहे. संबंधित इमारत अनधिकृत असल्याचे समोर आले आहे. एवढेच नव्हे तर इमारतीच्या अगदी शेजारी कचऱ्याचा प्रचंड साठा करण्यात आला होता. पावसामुळे हा कचरा ओला होऊन त्याचे वजन अनेक पटींनी वाढले आणि अखेर संपूर्ण डोंगरच इमारतीवर कोसळला. ही दुर्घटना अचानक घडलेली नसून ती अनेक दिवसांच्या दुर्लक्षाची परिणती आहे. जर प्रशासनाने वेळेवर कचऱ्याचे व्यवस्थापन केले असते, धोकादायक भागात कामगारांना काम करण्यास बंदी घातली असती किंवा सुरक्षा उपाययोजना केल्या असत्या, तर कदाचित आठ कुटुंबांवर आज दुःखाचा डोंगर कोसळला नसता. या दुर्घटनेने भ्रष्टाचाराचाही प्रश्न ऐरणीवर आणला आहे. कोणत्याही अनधिकृत इमारतीचे बांधकाम प्रशासनाच्या माहितिशिवाय होऊ शकत नाही. नियमांचे उल्लंघन करून इमारती उभ्या राहतात, त्यांना आवश्यक परवानग्या मिळतात किंवा त्याकडे दुर्लक्ष केले जाते, यामागे भ्रष्ट साखळी कार्यरत असल्याचा संशय बळावतो. जर वेळेवर कारवाई झाली असती, तर ही इमारतच अस्तित्वात आली नसती आणि निष्पाप कामगारांचा जीवही गेला नसता. कामगारांच्या सुरक्षेबाबतची उदासीनता ही आणखी एक गंभीर बाब आहे. देशाच्या विकासात मोठा वाटा उचलणारा कामगार वर्ग आजही अत्यंत असुरक्षित परिस्थितीत काम करतो. त्यांना पुरेशी सुरक्षा साधने, प्रशिक्षण किंवा धोका ओळखण्याची माहिती दिली जात नाही. अनेक वेळा कंत्राटी पद्धतीमुळे जबाबदारी झटकली जाते. अपघात झाला की भरपाई जाहीर केली जाते; पण जीव गमावलेल्या व्यक्तींची किंमत कोणतीही आर्थिक मदत भरून काढू शकत नाही. या दुर्घटनेनंतर प्रशासनाने चौकशीचे आदेश दिले, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईचे आश्वासन दिले आणि मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत जाहीर केली. मात्र, अशा घोषणा प्रत्येक दुर्घटनेनंतर ऐकायला मिळतात.

# चीन-तैवान तणाव : सततच्या लष्करी दबावाची मानवी आणि आर्थिक किंमत

आशिया-प्रशांत प्रदेशात चीन आणि तैवान यांच्यातील तणाव हा गेल्या काही वर्षांपासून जागतिक राजकारणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. चीन तैवानला आपल्या भूभागाचा अविभाज्य भाग मानतो, तर तैवान स्वतःचे स्वतंत्र लोकशाही शासन टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. या पार्श्वभूमीवर चीनने तैवानच्या समुद्रकिनाऱ्याजवळ आणि हवाई हद्दीच्या आसपास लष्करी गस्त, युद्धसराव आणि लढाऊ विमानांची व नौदल जहाजांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढविली आहे. या सततच्या लष्करी दबावामुळे तैवानच्या संरक्षण यंत्रणेला दिवसाचे चोवीस तास उच्च सतर्कतेवर राहावे लागत आहे. याचा परिणाम केवळ लष्करावरच नव्हे, तर देशाच्या अर्थव्यवस्थेवर, संसाधनांवर आणि नागरिकांच्या मानसिकतेवरही होत आहे.




चीनची लष्करी रणनीती केवळ युद्ध छेडण्यापुरती मर्यादित नाही. प्रत्यक्ष संघर्ष न करता विरोधी देशावर सातत्याने दबाव निर्माण करणे, त्याच्या संरक्षण व्यवस्थेला थकविणे आणि मानसिकदृष्ट्या कमकुवत करणे ही त्यामागील प्रमुख भूमिका आहे. चीनची युद्धनौका आणि लढाऊ विमाने वारंवार तैवानच्या सीमेजवळ येतात. त्यामुळे तैवानच्या हवाई दलाला त्वरित प्रतिसाद द्यावा लागतो. प्रत्येक वेळी लढाऊ विमाने उड्डाण करणे, नौदलाची गस्त वाढविणे आणि सैन्याला सज्ज ठेवणे यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ, इंधन आणि आर्थिक संसाधने खर्च होतात.

या परिस्थितीचा सर्वाधिक परिणाम तैवानच्या सैनिकांवर होत आहे. सततच्या सतर्कतेमुळे त्यांना विश्रांतीसाठी पुरेसा वेळ मिळत नाही. कोणत्याही क्षणी आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ शकते, या भीतीमुळे त्यांच्यावर प्रचंड मानसिक ताण निर्माण होतो. दीर्घकाळ अशा वातावरणात राहिल्यामुळे मानसिक थकवा, नैराश्य, चिंता आणि कार्यक्षमतेत घट यांसारख्या समस्या निर्माण होतात. आधुनिक युद्धात सैनिकांची मानसिक तयारी ही शारीरिक क्षमतेइतकीच महत्त्वाची असते. मानसिकदृष्ट्या थकलेले सैन्य कोणत्याही संकटाला प्रभावीपणे सामोरे जाऊ शकत नाही.

तैवान हा भौगोलिकदृष्ट्या लहान देश असून त्याची संसाधने मर्यादित आहेत. त्यामुळे सततच्या लष्करी तयारीसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करावा लागतो. संरक्षण खर्च वाढल्यामुळे शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि सामाजिक कल्याण यांसारख्या क्षेत्रांसाठी उपलब्ध निधी कमी होण्याची शक्यता निर्माण होते. एका छोट्या अर्थव्यवस्थेसाठी हा आर्थिक भार दीर्घकाळ पेलणे सोपे नसते.

याशिवाय, सततच्या तणावामुळे उद्योग आणि व्यापारावरही परिणाम होतो. तैवान हा जगातील अत्याधुनिक सेमीकंडक्टर उद्योगाचा प्रमुख केंद्रबिंदू आहे. जगभरातील इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या चिप्सच्या उत्पादनात तैवानची महत्त्वाची भूमिका आहे. जर चीन-तैवान संघर्ष तीव्र झाला, तर जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. त्यामुळे केवळ तैवानच नव्हे, तर अमेरिका, युरोप, जपान आणि भारतासह अनेक देशांच्या उद्योगांवर त्याचा परिणाम होऊ शकतो.

सततच्या लष्करी तणावामुळे परदेशी गुंतवणूकदारांमध्येही असुरक्षिततेची भावना निर्माण होते. युद्धाचा धोका असल्यास नवीन गुंतवणूक कमी होऊ शकते किंवा विद्यमान उद्योग इतर देशांकडे स्थलांतरित होऊ शकतात. परिणामी रोजगाराच्या संधी कमी होतात आणि आर्थिक विकासाचा वेग मंदावतो. पर्यटन क्षेत्रालाही याचा मोठा फटका बसतो. अस्थिर वातावरणामुळे परदेशी पर्यटक तैवानला भेट देण्यास टाळाटाळ करतात.

तैवानच्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही या तणावाचा परिणाम होत आहे. युद्धाची शक्यता लक्षात घेऊन सरकारकडून नियमित आपत्कालीन सराव, नागरी संरक्षण प्रशिक्षण आणि सुरक्षितता उपाययोजना राबविल्या जातात. त्यामुळे समाजात असुरक्षिततेची भावना वाढते. विशेषतः लहान मुले, विद्यार्थी आणि वृद्ध नागरिक यांच्यावर या वातावरणाचा मानसिक परिणाम होतो. चीनच्या या धोरणामागे राजकीय संदेशही दडलेला आहे. तैवानने स्वतंत्र राष्ट्र म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक मान्यता मिळवू नये आणि इतर देशांनी त्याला खुला पाठिंबा देऊ नये, यासाठी चीन सातत्याने दबावाचे राजकारण करत आहे. दुसरीकडे अमेरिका आणि तिचे सहयोगी देश तैवानच्या सुरक्षेला अप्रत्यक्ष पाठिंबा देत असल्याने या प्रदेशातील सामरिक स्पर्धा अधिक तीव्र होत आहे.

तथापि, कोणत्याही संघर्षाचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांनाच बसतो. युद्धाची किंवा सततच्या तणावाची किंमत सैनिक, कामगार, उद्योग, विद्यार्थी आणि सर्वसामान्य जनता भरत असते. त्यामुळे चीन आणि तैवान या दोन्ही बाजूंनी संवादाचा मार्ग स्वीकारणे ही काळाची गरज आहे. राजनैतिक चर्चेद्वारे मतभेद दूर करण्याचा प्रयत्न झाला, तरच या प्रदेशात दीर्घकालीन शांतता प्रस्थापित होऊ शकते.

संयुक्त राष्ट्रसंघासह आंतरराष्ट्रीय समुदायानेही या प्रश्नात सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक आहे. दोन्ही देशांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी, लष्करी हालचालींवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि तणाव कमी करण्यासाठी मध्यस्थीची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. जागतिक अर्थव्यवस्था आज परस्परावलंबी झाली आहे. त्यामुळे चीन-तैवान संघर्षाचा परिणाम केवळ या दोन देशांपुरता मर्यादित राहणार नाही, तर संपूर्ण जगाला त्याची झळ बसू शकते.

शेवटी, चीनची सततची लष्करी गस्त ही केवळ सुरक्षा विषयक बाब नाही; ती मानसिक, आर्थिक आणि सामाजिक परिणाम घडविणारी गंभीर समस्या आहे. तैवानच्या सैनिकांवर वाढणारा मानसिक ताण, संरक्षण खर्चामुळे अर्थव्यवस्थेवर पडणारा भार आणि नागरिकांमध्ये वाढणारी असुरक्षितता हे या तणावाचे दुष्परिणाम आहेत. आधुनिक जगात युद्धापेक्षा शांतता आणि संवाद अधिक प्रभावी ठरतात. त्यामुळे दोन्ही बाजूंनी संयम, परस्पर विश्वास आणि राजनैतिक चर्चेच्या माध्यमातून हा वाद सोडविण्याचा प्रयत्न करणे हीच दीर्घकालीन स्थैर्य आणि जागतिक शांततेची गुरुकिल्ली ठरेल.

# वरुडचा युवा उद्योजक दर्शन लोकेश अग्रवाल : उद्योग, व्यापार आणि समाजसेवेचा प्रेरणादायी प्रवास

अल्पवयात आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर उद्योग, व्यापार आणि सामाजिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करणारे दर्शन लोकेश अग्रवाल यांचा वाढदिवस आज उत्साहाच्या वातावरणात साजरा होत आहे. जिद्द, चिकाटी, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टी यांच्या बळावर त्यांनी कमी वयातच यशाची उल्लेखनीय शिखरे गाठत वरुड शहराचे नाव अभिमानाने उंचावले आहे.



कापूस जिनिंग-प्रेसिंग उद्योग तसेच धान्य व्यापार या क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्यकुशलतेची ठळक छाप उमटवली आहे. आधुनिक व्यवस्थापन, गुणवत्तेला दिलेले प्राधान्य आणि ग्राहकांचा जिंकलेला विश्वास यांच्या बळावर त्यांनी आपल्या व्यवसायाचा सातत्याने विस्तार केला आहे. त्यांच्या उद्योगामुळे अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असून स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळ मिळाले आहे.

व्यवसायातील यशासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचे कामही दर्शन अग्रवाल यांनी तितक्याच समर्पितपणे केले आहे. वरुड शहरातील चुडामणी नदी स्वच्छता अभियानात त्यांनी सक्रिय सहभाग घेत पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेचा प्रभावी संदेश दिला. समाजोपयोगी उपक्रमांमध्ये त्यांचा सातत्याने असलेला सहभाग हा त्यांच्या संवेदनशील आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून देतो.

उद्योग आणि समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना 'युवा उद्योजक पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे. हा सन्मान त्यांच्या मेहनतीचा, दूरदृष्टीचा आणि समाजाप्रती असलेल्या जबाबदारीच्या भावनेचा गौरव मानला जातो. अल्पवयात मिळवलेले हे यश अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

साधेपणा, नम्रता, सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची वृत्ती आणि सामाजिक जाणीव या गुणांमुळे त्यांनी व्यावसायिक क्षेत्रासह समाजातही मानाचे स्थान मिळवले आहे. यशाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांनी समाजाशी असलेली नाळ कायम जपली असून विकासाबरोबर सामाजिक उत्तरदायित्वही तितक्याच प्रामाणिकपणे निभावले आहे.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त कुटुंबीय, मित्रपरिवार, व्यावसायिक सहकारी, सामाजिक संस्था आणि वरुड शहरातील नागरिकांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. आगामी काळातही त्यांनी उद्योग, व्यापार, समाजसेवा आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात अधिक उंच भरारी घ्यावी, उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अखंड यश लाभावे, हीच सर्वांची मनःपूर्वक सदिच्छा.

दर्शन लोकेश अग्रवाल यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! त्यांच्या कर्तृत्वाचा प्रवास नव्या यशशिखरांकडे असाच अविरत सुरू राहो, हीच शुभेच्छा.

# रोजच्या ताटात विष!

माणसाच्या मूलभूत गरजांपैकी सर्वांत महत्त्वाच्या असलेल्या अन्नातच किती मोठ्या प्रमाणावर भेसळ सुरू आहे, हे गेल्या काही दिवसांत एफडीएने केलेल्या कारवाईतून समोर आले आहे. त्यामुळे आपण जे अन्न खातो ते खरोखरच सुरक्षित आहे का? हा प्रश्न आता सर्वसामान्यांना सतावत आहे.तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारल्यापासून राज्यभरात कारवायांचा धडाका लावला आहे. आतापर्यंत राज्यभरात ९०४ ठिकाणी छापे टाकण्यात आले. त्यातून ३४.६६ कोटी रुपयांचा प्रतिबंधित आणि भेसळयुक्त माल जप्त करण्यात आला. २३५ गुन्हे दाखल झाले, ४५७ जणांना अटक करण्यात आली आणि २७४ आस्थापना सील करण्यात आल्या. ही राज्यातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या अन्नसुरक्षा मोहिमांपैकी एक आहे. या आकड्यांवरून स्पष्ट होते, की भेसळीचा हा धंदा किती मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. छाप्यांमध्ये सापडलेला माल पाहिला तर काळजी वाटते. त्यात प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखू तर आहेच, पण त्याहून धोकादायक म्हणजे, नकली दूध, नकली पनीर आणि निकृष्ट दर्जाचा मावा. रसायने आणि व्हे प्रिमिक्स पावडर वापरून दूध बनवले जात आहे. एक्सपायरी झालेले अन्नपदार्थ तारीख बदलून पुन्हा विकले जात आहेत.

विचार करा, सकाळी सकाळी आपल्या मुलांना दिलेले ग्लासभर दूध, सणाला घरी बनवलेली बासुंदी, लग्नात वाढलेली पनीरची भाजी, यात जर भेसळ असेल तर? दूध हे संपूर्ण आहार मानले जाते. त्यातच जर पाणी, युरिया किंवा रसायन मिसळले असेल, तर कॅल्शियम आणि प्रोटीनऐवजी आपण चक्क आजार विकत घेतोय... लहान मुलांच्या वाढीवर, गर्भवती महिलांच्या आरोग्यावर आणि वृद्धांच्या किडनीवर याचा थेट परिणाम होतो.निकृष्ट मावा आणि कालबाह्य पदार्थांमुळे फूड




पॉयझनिंग, कावीळ, पोटाचे विकार तर वाढतातच, पण त्याहून गंभीर म्हणजे दीर्घकाळ अशा अन्नाचे सेवन केल्याने कर्करोग, हार्मोनल बिघाड आणि प्रतिकारशक्ती कमी होण्याचा धोका असतो. ९०४ ठिकाणी छापे आणि ३४ कोटींची जप्ती म्हणजे ही काही एक-दोन दुकानदारांची लबाडी नाही. ही एक संघटित साखळी आहे. उत्पादक, घाऊक विक्रेता, वाहतूकदार आणि किरकोळ विक्रेता या सगळ्यांचा यात सहभाग आहे. नफ्यासाठी माणसांच्या आरोग्याशी खेळणारे हे एक मोठे रॅकेट आहे.

सगळ्यात वाईट बाब म्हणजे याचे बळी सर्वसामान्य नागरिक होतात. महागाईमुळे स्वस्त पर्याय शोधणारा मध्यमवर्गीय आणि गरीब माणूसच या भेसळीच्या जाळ्यात अडकतो. त्याला माहितीही नसते की तो काय खात आहे. तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेल्या कारवाईमुळे व्यापाऱ्यांमध्ये धाक निर्माण झाला आहे. ४५७ जणांना अटक आणि २७४ आस्थापना सील यामुळे 'दंड भरून मोकळे होऊ' ही मानसिकता मोडली आहे. 'अन्नात भेसळ केली तर सुटका नाही' हा संदेश यातून गेला आहे. यासाठी तुकाराम मुंढे यांचे मनापासून आभार.परंतु, एका मोहिमेने हा प्रश्न सुटणार नाही. अशा धडक मोहिमा अधूनमधून होऊन उपयोग नाही. वर्षभर, दर महिन्याला अचानक तपासणी झाली पाहिजे. म्हणजे प्रत्येक व्यापाऱ्याला कधीही छापा पडू शकतो ही भीती राहील.गुन्हे दाखल होऊन वर्षानुवर्षे केस चालतात. तोपर्यंत आरोपी जामिनावर बाहेर येऊन पुन्हा धंदा सुरू करतात. त्यामुळे अशी प्रकरणे फास्टट्रॅक कोर्टात चालवून लवकरात लवकर त्यांचा निकाल लागला पाहिजे आणि दोषींना कठोरातील कठोर शिक्षा झाली पाहिजे, जेणेकरून पुन्हा दुसरा कोणी भेसळ करायला घाबरेल. अन्नसुरक्षा ही फक्त एफडीएची जबाबदारी नाही. ती सरकारची, उत्पादकांची, विक्रेत्यांची आणि आपलीही आहे. तुकाराम मुंढे यांनी काडी टाकली आहे. आता त्याची आग होऊन संपूर्ण व्यवस्था स्वच्छ झाली पाहिजे. भेसळमुक्त अन्न हा आपला अधिकार आहे आणि तो मिळवण्यासाठी आता आपण सगळ्यांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे. त्यासाठी आपणही वैयक्तिक पातळीवरही काही गोष्टी नक्की करू शकतो. कारण, एकदा आरोग्य गेले की ते परत मिळवता येत नाही आणि ते जपायचे असेल तर सुरुवात आपल्या ताटापासूनच करावी लागेल.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# अटकपूर्व जामीन अर्जावरील सुनावणीपूर्वी विनायक राऊतांना झटका

## अंतरिम संरक्षण देण्यास कोर्टाचा नकार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते आणि माजी खासदार विनायक राऊत यांच्या अडचणीत मोठी भर पडली आहे. त्यांची सून गिरीजा राऊत यांनी दिलेल्या तक्रारीवरून विनायक राऊत आणि त्यांचा मुलगा गितेश राऊत यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कौटुंबिक छळ आणि जादूटोणा विरोधी कायद्यांतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्याप्रकरणी आता ठाणे न्यायालयातून एक अत्यंत महत्त्वाची आणि कायदेशीर अपडेट समोर आली आहे.



या प्रकरणातील संशयित आरोपी विनायक राऊत आणि त्यांचा मुलगा गितेश राऊत यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर अद्याप न्यायालयात अंतिम सुनावणी झालेली नाही. मात्र, या मुख्य अर्जावर सुनावणी होईपर्यंत पोलिसांनी आपल्याला अटक करू नये, अशी मागणी करणारा राऊत पिता-पुत्राचा 'अंतरिम अर्ज' न्यायालयाने फेटाळून लावला आहे.

त्यामुळे विनायक राऊत यांच्या मुख्य जामीन अर्जावर अद्याप निर्णय होणे बाकी असले, तरी कोर्टाने अंतरिम दिलासा नाकारल्यामुळे त्यांच्यावर अटकेची टांगती तलवार कायम आहे. कापूरबावडी पोलीस त्यांना चौकशीसाठी कधीही ताब्यात घेऊ शकतात.

# भारताच्या सर्वात मोठ्या अणुऊर्जा प्रकल्पाचा संवेदनशील डेटा डार्क वेबवर?

## १९ हजार गोपनीय फाईल्स लीक झाल्याचा दावा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**कुडनकुलम** – भारतातील सर्वात मोठ्या कुडनकुलम अणुऊर्जा प्रकल्पाशी संबंधित हजारो गोपनीय आणि संवेदनशील दस्तावेज डार्क वेबवर लीक झाल्याचा धक्कादायक दावा एका रॅन्समवेअर गटाने केला आहे. 'वर्ल्ड लीक्स' नावाच्या सायबर गुन्हेगार टोळीने हा डेटा लीक केला असून, यामध्ये प्रकल्पाच्या अत्यंत संवेदनशील भागांचे ब्लूप्रिंट, पुरवठादारांची माहिती, महत्त्वपूर्ण बैठकींचे तपशील आणि विम्याच्या कागदपत्रांचा समावेश असल्याचा दावा केला आहे. या सायबर हल्ल्यामुळे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अनिल अंबानींच्या 'रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर'चा डेटा चोरीला 'वर्ल्ड लीक्स'चा दावा आहे की, लीक झालेला हा सर्व डेटा कुडनकुलम प्रकल्पाचे कंत्राटदार असलेल्या अनिल अंबानी यांच्या 'रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर'शी संबंधित आहे. रिलायन्सनेही या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली असून, थर्ड पार्टी डेटा सेंटर असलेल्या 'योट्टा'च्या सर्व्हरमधील डेटामध्ये घुसखोरी झाल्याची कबुली दिली आहे. रिलायन्सने या सायबर चोरीबाबत केंद्र सरकारला पूर्वकल्पना दिली होती. मात्र, नेमका किती डेटा लीक झाला आहे आणि त्याचे गांभीर्य किती आहे, याची स्पष्ट माहिती सरकारला देण्यात आली नव्हती, असे आता समोर येत आहे. ८.५ लाख फाईल्सपैकी १९००० फाईल्स अत्यंत संवेदनशील डार्क वेबवर अपलोड करण्यात आलेल्या एकूण ८ लाख ५८ हजार फाईल्सपैकी तब्बल १९००० फाईल्स या 'अत्यंत संवेदनशील' प्रवर्गातील आहेत. या लीक झालेल्या डेटाबाबत मिळालेल्या माहितीनुसार, रिलायन्स कंपनीकडून सध्या कुडनकुलम प्रकल्पाच्या युनिट-३ आणि युनिट-४ ची निर्मिती केली जात आहे.



## महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयात

# इयत्ता अकरावी प्रवेशित विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव कार्यक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयाच्या प्रांगणात इयत्ता अकरावी प्रवेशित विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या थाटात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले व डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन राष्ट्रीगीताने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.संजय सातपुते तर प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका अलका पवार, निलेश ठाकरे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक अलका पवार यांनी केले. यावेळी त्यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी संपूर्ण विदर्भात सर्व सामान्यांसाठी शिक्षणाची सोय व्हावी म्हणून या संस्थेची स्थापना केली असे सांगितले तर निलेश ठाकरे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पालन करावयाच्या नियमाबाबतची माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.संजय सातपुते यांनी अकरावी प्रवेशित मुलांचे मन:पूर्वक स्वागत करुन कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षण हे वरिष्ठ महाविद्यालयासाठीचे प्रवेशद्वार आहे असे म्हटले. त्याचबरोबर आपल्या महाविद्यालयातून अधिक गुणवंत विद्यार्थी घडावेत. ज्ञानाची व यशाची अखंड परंपरा अविरत चालु राहावी, असा आशावाद व्यक्त केला.

याप्रसंगी वर्ग अकरावीमध्ये प्रवेश घेतलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. त्याचबरोबर कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षकांचा विद्यार्थ्यांना परिचय करून देण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन वैशाली गेडेकर तर आभार डॉ.चंद्रभूज कदम यांनी मानले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**वरुड** : भारतीय जनता पार्टीच्या जिल्हाध्यक्षपदी आमदार प्रताप अडसड यांची नियुक्ती झाल्याबद्दल पुष्पगुच्छ देवुन स्वागत करतांना टेंभुरखेडाच्या सरपंच रोशनी निंभोरकर व इतर.

# बुलेट ट्रेनचा तात्पुरता पूल गेला वाहून : काम रखडणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाला मोठा फटका बसला आहे. दिवा आणि भिवंडी दरम्यान उल्हास नदीवर बांधलेला तात्पुरता स्टीलचा पूल मुसळधार पावसात वाहून गेला आहे. हा पूल मुख्यत्वे अवजड यंत्रसामग्री, बांधकाम साहित्य आणि कामगारांची ने-आण करण्यासाठी बांधण्यात आला होता. जुलैच्या सुरुवातीला झालेल्या जोरदार पावसामुळे नदीपात्रात पाणी वाढल्याने हा पूल वाहून गेला असून, यामुळे प्रकल्पाच्या कामात काही महिन्यांचा विलंब होण्याची शक्यता आहे.



दहा फूट रुंदीचा पूल वाहून गेल्यामुळे येथील वाहतूक पूर्णपणे थांबली आहे. परिणामी, नवीन तात्पुरता पूल उभारल्यानंतरच मुख्य पुलाचे काम पुन्हा सुरू होऊ शकणार आहे, ज्याचा थेट परिणाम प्रकल्पाच्या गतीवर झाला आहे. सध्या महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल कॉरिडॉरचे काम वेगाने सुरू आहे.

# उद्धव ठाकरे म्हणाले, थोडं थांबा..आपले चांगले दिवस येणार!

## नाशिक महापालिकेतील नगरसेवकांशी 'मातोश्री'वर खलबते

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – विकास निधीच्या नावाखाली पक्षांतराचे आमिष टाळून तुम्ही निष्ठा दाखवली, हे निश्चितच अभिनंदनीय आहे. सध्या आपला पक्ष संक्रमणावस्थेतून वाटचाल करतोय, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, काही दिवस धीर धरा, आपल्या निश्चित गतवैभव प्राप्त होईल, असा विश्वास शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. नाशिक महापालिकेतील नगरसेवकांनी 'मातोश्री' वर ठाकरे यांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते.



नाशिकचे १५ पैकी बारा उबाठा नगरसेवक शिंदे सेनेच्या गळाला लागणार असल्याच्या बातमीने राजकीय वातावरण ढवळून निघाले होते. फुटीर नगरसेवक नेमके कोण, या विषयाची उबाठा पक्षासह राजकीय वतुर्ळात खमंग चर्चा होती. त्यानंतर लगोलग पक्षाचे गटनेते केशव पोरजे यांनी स्वकीयांची वज्रमूठ आवळत आम्ही सारे सोबत असल्याचा निवाळा दिला होता. संपर्कप्रमुख रवींद्र मिर्लेकर यांनीही नाशिकला धाव घेत नगरसेवकांच्या बैठकीचे आयोजन करत ऐक्याचा नारा दिला होता. त्यानंतर आज सर्व नगरसेवक पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी मुंबईत 'मातोश्री' निवासस्थानी दाखल झाले. नाशिकचा दौरा करणार प्रशासकीय राजवटीनंतर लोकप्रतिनिधी सत्तेत येऊनदेखील नाशिकमधील अनेक समस्या 'जैसे थे' असल्याची बाब नगरसेवकांनी उद्धव ठाकरे यांच्या लक्षात आणून दिली. बेसुमार वृक्षतोड, खोदून ठेवलेले रस्ते, त्यामुळे झालेले अपघात आणि मृत्यू, नागरिकांची अस्वस्थता, वेळोवेळी होणारी वाहतूक कोंडी, पर राज्यातील कंत्राटदारांना दिलेली कामे असह अनेक विषयांचा उहापोह बैठकीत झाला.

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त

# बसस्थानक परिसरात वृक्षारोपण अभियान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त शहरातील वरुड बसस्थानक परिसरात वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले.

झाडे ही पृथ्वीची फुफ्फुसे असून ती प्राणवायू पुरवतात, कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात, तापमान नियंत्रित ठेवतात आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे एक झाड लावणे म्हणजे भविष्यातील अनेक संकटांवर उपाय उभा करणे होय, एसटी महामंडळ हे केवळ प्रवाशांना सेवा देणारे परिवहन माध्यम नसून समाजाशी नाळ जोडलेली सामाजिक संस्था आहे, असेही आगार व्यवस्थापक आकाश तागडे यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी वरुड बसस्थानक परिसरामध्ये विविध वृक्षांचे रोपण करण्यात आले तसेच यावेळी ज्या वृक्षांची लावगड करण्यात आली त्या वृक्षांचे जतन करण्याचे आश्वासन सुध्दा यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांनी दिले. याप्रसंगी आगार व्यवस्थापक आकाश तागडे, वाहतुक निरिक्षक विनीत कुळकर्णी, कर्मचारी राम चावरे, सुरेंद्र अस्वार, रमीज खान, मंगल इखे, रामदास पाचघरे, सुधिर अकोलकर, आगार लेखागार भाग्यश्री उल्हे, वरिष्ठ लिपिक उज्वला पंडागळे, शुभांगी अळसपुरे, सुरेखा राठोड, अंजली अनावडे, सुरक्षा रक्षक नरेश झोपाटे यांचेसह कार्यालयीन व यांत्रिकी विभागातील कर्मचारी, चालक, वाहक आणि इतर मान्यवर उपस्थित होते.




## हनुमान पेठ मुसळखेडा येथील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान

# श्री सद्गुरु योगीराज बाबा यांचा १८ जुलैला जन्मोत्सव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**चांदस वाठोडा** – येथून जवळच असलेल्या हनुमान पेठ मुसळखेडा येथील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान श्री सद्गुरु योगीराज बाबा यांचा जन्मोत्सव येत्या १८ जुलैला श्री क्षेत्र योगीराज बाबा आश्रम येथे भाविक भक्तांच्या उपस्थितीत साजरा होणार आहे.

या सोहळ्याला हनुमान पेठ मुसळखेडा येथे गावातीलच नव्हे तर संपूर्ण विदर्भासह मध्यप्रदेश येथे हजारो भाविक उपस्थित राहणार आहे. यावर्षी परमपूज्य श्री सद्गुरु योगीराज बाबा यांचा ९२ वा पवित्र जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात दरवर्षीप्रमाणे अत्यंत भक्तिभाव, उत्साह आणि आनंदात साजरा करण्यात येत आहे. सद्गुरु योगीराज माऊली देहाने आपल्यामध्ये नसले तरी त्यांचे चैतन्यमय अस्तित्व, आशीर्वाद आणि कृपाछाया सदैव आपल्या सर्वांवर आहेत. त्यांच्या पवित्र स्मृतींना वंदन करुन यंदाचा जन्मोत्सव तिथीनुसार आषाढ शुक्ल पंचमी येत्या १८ जुलै २०२६ रोजी साजरा करण्यात येणार असून सकाळी ६:३० ला बाबांच्या समाधीचे मंगल स्नान व पूजन करण्यात येईल तसेच सकाळी ७ वाजता बाबांची आरतीचे आयोजन करण्यात येणार आहे. सकळी १० वाजता वाठोडा येथील ह.भ.प.सुधाकर महाराज देशमुख यांच्या सुमधुर वाणीमधून कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. किर्तन झाल्यानंतर लगेच महाप्रसादाचे वितरण करण्यात येईल. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता बाबांची महाआरती करण्यात येईल. या कार्यक्रमाला सर्व भाविक उपस्थिती दर्शवुन महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आव्हान श्री सद्गुरु योगीराज महाराज आश्रम, हनुमान पेठ मुसळखेडा महिला विकास संस्था व योगीराज महाराज बहुउद्देशीय संस्था यांच्यासह भाविक भक्त मंडळींच्या वतीने एका प्रसिद्ध पत्रकाद्वारे करण्यात आलेले आहे.



# शासकीय बंगल्याऐवजी फ्लॅट दिल्याने उपसभापती सचिन अहिर नाराज?

## एकनाथ शिंदेंकडे तक्रार करणार : नीलम गोऱ्हेंकडील बंगला अण्णा बनसोडे यांना बहाल

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – विधान परिषदेचे नवनियुक्त उपसभापती सचिन अहिर यांना शासकीय बंगल्याचे वाटप करताना प्रशासनाकडून एकामागून एक दोन मोठे धक्के बसले असून, सुसज्ज बंगल्यांऐवजी फ्लॅट आवंटित झाल्याने ते नाराज आहेत. माजी उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याकडील 'पुरंदर' बंगला आपल्याला मिळेल अशी अपेक्षा असतानाच, महायुतीमधील अंतर्गत समीकरणांमुळे हा बंगला विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांना देण्यात आल्याने अहिर यांची नाराजी वाढली आहे. बंगल्याऐवजी प्रशासनाने सदनिका (फ्लॅट) दिल्यामुळे अहिर यांनी अद्याप तिथे राहण्यास जाणे टाळले असून, या संपूर्ण प्रकाराबाबत ते उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार करणार आहेत.

माजी उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या जागी सचिन अहिर यांची वर्णी लागल्यानंतर विधानभवनातील गोऱ्हे यांचे दालन अहिर यांना देण्यात आले. त्यामुळे गोऱ्हे यांच्या ताब्यातील शासकीय बंगलाही अहिर यांनाच मिळेल, असे राजकीय वतुर्ळात गृहीत धरले जात होते. मात्र, प्रत्यक्षात बंगल्यांच्या वाटपावरून पडद्यामागे मोठे नाट्य घडले.



सुरुवातीला सचिन अहिर यांना मंत्रालयासमोर असलेला 'रायगड' (ए-६) हा बंगला मंजूर करण्यात आला होता. मात्र, हा बंगला सध्या एका वरिष्ठ नेत्याच्या वापरात असल्यामुळे हा निर्णय तडकाफडकी रद्द करण्यात आला. यानंतर सचिन अहिर यांनी नीलम गोऱ्हे यांच्या ताब्यात असलेल्या 'पुरंदर' (सी-३) या बंगल्यावर आपला दावा सांगितला होता. परंतु, तिथेही महायुतीमधील अंतर्गत समीकरणांमुळे मोठा ट्विस्ट आला. विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनीही याच बंगल्यासाठी जोरदार फिल्डिंग लावली होती.

# अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचनासाठी शंभर टक्के अनुदान : कृषी विभागाचे अर्ज करण्याचे आवाहन

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

***अमरावती*** – राष्ट्रीय कृषी विकास योजना (प्रति थेंब अधिक पीक) अंतर्गत जिल्ह्यातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी ठिबक व तुषार सिंचन संच खरेदी करण्यासाठी शासनामार्फत संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.



विविध शासकीय योजनांच्या समन्वयातून या प्रवर्गातील शेतकऱ्यांना आता तब्बल शंभर टक्के अनुदान मिळणार आहे. या योजनेचा मुख्य उद्देश पाणीबचत करून पिकांची उत्पादकता वाढवणे आणि वंचित घटकांतील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा आहे.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के, तर इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदान दिले जाते. यामध्ये आणखी भर घालत मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेतून अल्प व अत्यल्प भूधारकांना २५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ३० टक्के पूरक अनुदान मिळते.

याशिवाय, उर्वरित रक्कम जिल्हा परिषदेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन मिशन आणि बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या माध्यमातून (अल्प व अत्यल्प भूधारकांसाठी १० टक्के आणि इतरांसाठी १५ टक्के) पूरक अनुदान असे एकूण ९० टक्के म्हणून दिली जाते. यामुळे शेतकऱ्यांवर कोणताही आर्थिक भार पडणार नसून त्यांना एकूण १०० टक्के अनुदान प्राप्त होईल.

या शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांकडे स्वतःच्या मालकी हक्काचा चालू ७/१२ उतारा, ८-अ उतारा असणे तसेच शेतात ओलीताची (पाण्याची) शाश्वत सोय असणे बंधनकारक आहे. पात्र व गरजू शेतकऱ्यांनी शासनाच्या अधिकृत महाडीबीटी पोर्टलवर जाऊन ऑनलाईन पद्धतीने त्वरित अर्ज सादर करावेत.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेऊन आपले शेती उत्पादन वाढवावे, असे आवाहन अमरावतीच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अर्चना निस्ताने यांनी केले आहे.

# देवेंद्र फडणवीस केंद्रात गेले तर राज्याचे नेतृत्व कोण करणार?

## कृषिमंत्र्यांनी बोलून दाखवली मनातील इच्छा

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळात सध्या मुख्यमंत्री पदाच्या चर्चांना अचानक उधाण आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्लीला जाणार असल्याचा दावा विरोधी पक्षांकडून केला जात आहे.



फडणवीस केंद्रात गेले तर राज्याचे नेतृत्व कोण करणार, यावरून राजकीय तर्क-वितर्क लावले जात असतानाच, आता राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी यावर एक मोठे वक्तव्य केले आहे. फडणवीस केंद्रात गेल्यास राज्याची धुरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांभाळावी, अशी थेट इच्छा त्यांनी बोलून दाखवली आहे. दत्तात्रय भरणे म्हणाले की, 'मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी केलेले काम उल्लेखनीय आहे. त्यांनी देशाच्या सर्वोच्च नेतृत्वात जावे, अशी राज्यातील अनेकांची इच्छा आहे. महाराष्ट्रातील व्यक्तीने देशाच्या प्रमुख पदावर विराजमान व्हावे, यासाठी योग्य वेळ लवकरच येईल. देवेंद्र फडणवीस केंद्रात गेले, तर राज्याचे नेतृत्व कोण करणार, हा प्रश्न आहे. प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना आपल्या पक्षाचाच नेता मुख्यमंत्री व्हावा असे वाटते. त्याचप्रमाणे मलाही राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री व्हावे, असे वाटते,' असे त्यांनी म्हटले आहे.

अर्थखात्याच्या तिढ्याबाबत दत्तात्रय भरणेंचं मोठं वक्तव्य दरम्यान, दिवंगत अजित पवार यांच्या भीषण विमान अपघाताला आणि निधनाला ५ महिने उलटून गेले आहेत. उपमुख्यमंत्रीपदासह राज्याच्या अर्थखात्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी अजित दादांच्या खांद्यावर होती. मात्र त्यांच्या अपघाती निधनानंतर, समोरच अर्थसंकल्प असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्पुरती अर्थखात्याची जबाबदारी स्वतःकडे ठेवली होती.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात फडणवीस यांनीच अर्थसंकल्प सादर केला होता. त्यानंतर हे खाते राष्ट्रवादी काँग्रेसकडे सोपवले जाईल अशी शक्यता होती, मात्र अद्यापही हा तिढा सुटलेला नाही. यावरून दत्तात्रय भरणे यांनी एक मोठं वक्तव्य केलंय. अर्थ खात्याबाबतचा निर्णय अद्याप झालेला नाही.

# विनायक राऊतांना अटक करा! : अंजली दमानिया

## सामान्य माणूस असता तर एव्हाना कायद्याचा बडगा उगारला असता

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – उबाठा गटाचे माजी खासदार विनायक राऊत यांच्यावर त्यांच्या सुनेने केलेल्या गंभीर आरोपांनंतर सामाजिक आणि राजकीय वतुर्ळातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही या प्रकरणात नाराजी व्यक्त करीत राऊत यांना तातडीने अटक करण्याची मागणी केली आहे. 'विनायक राऊत यांच्या जागी जर कोणी सर्वसामान्य व्यक्ती असती, तर आतापर्यंत त्याला तात्काळ अटक करून कायद्याचा बडगा उगारला असता. मात्र, राजकीय नेत्यांच्या बाबतीत तसे घडताना दिसत नाही,' अशा शब्दांत दमानिया यांनी नाराजी व्यक्त केली.



माध्यमांशी संवाद साधताना अंजली दमानिया म्हणाल्या, 'माझ्या मनात कोणाच्याही कौटुंबिक जीवनात पडण्याची काडीमात्र इच्छा नाही. परंतु, एका माजी खासदारावर आणि त्यांच्या कुटुंबावर कौटुंबिक छळाचे कलम ८५ तसेच नरबळी व अघोरी प्रथा प्रतिबंधक कायद्याचे कलम ३(२) आणि ३(३) लागणे हे अत्यंत धक्कादायक आहे. सार्वजनिक पदावर राहिलेल्या व्यक्तीच्या कुटुंबावर जेव्हा इतके गंभीर आरोप होतात, तेव्हा त्याची चौकशी पूर्णपणे पारदर्शक पद्धतीनेच व्हायला हवी', अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विनायक राऊत यांची सून गिरिजा राऊत यांनी पती गीतेश राऊत, सासरे विनायक राऊत यांच्यासह कुटुंबातील एकूण ७ जणांविरुद्ध कौटुंबिक छळ आणि अंधश्रद्धा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरूड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५९०/२०२६** **ने.ता.१९/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती ज्योती अरुण खुजे, वय अं.५१ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.सावंगा, ता.वरुड, जि.अमरावती, २) कु.निकीता अरुणपंत खुजे, (लग्नाअगोदरचे नाव) सौ.निकीता धिरज जाणे (लग्नानंतरचे नाव), वय अं.२८ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.जोलवाडी, ता.आष्टी, जि.वर्धा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत अरुण गुलाबराव खुजे, रा.सावंगा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१९/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१४/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# नाशिकच्या पंचवटीत श्री जगन्नाथ रथयात्रेला मोठ्या उत्साहात प्रारंभ

## हजारो भाविकांची मांदियाळी

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)

***नाशिक***– दरवर्षीप्रमाणे यंदाही नाशिक शहराच्या पंचवटी परिसरातील श्री पंचमुखी हनुमान मंदिरातून श्री जगन्नाथ रथयात्रेला आज मोठ्या भक्तीमय वातावरणात आणि उत्साहात प्रारंभ झाला आहे. या भव्य रथयात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी आणि भगवान जगन्नाथांचे दर्शन घेण्यासाठी संपूर्ण नाशिक शहराच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. विधीवत अभिषेकानंतर रथयात्रेला सुरुवात गेल्या आठवड्यात भगवान जगन्नाथांना विधीवत अभिषेक घालण्यात आला होता. सर्व धार्मिक विधी पार पडल्यानंतर, आज १६ जुलै रोजी परंपरेनुसार या भव्य रथयात्रेला सुरुवात




करण्यात आली.

मर्दानी खेळ ठरले मुख्य आकर्षण यंदाच्या रथयात्रेत केवळ भक्तीचाच नव्हे तर शौर्याचाही संगम पाहायला मिळत आहे. यात्रेत सादर केले जाणारे पारंपारिक 'मर्दानी खेळ' सर्वांचे लक्ष वेधून घेत असून, या खेळांची चित्तथरारक प्रात्यक्षिके पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली आहे. भाविकांसाठी ठिकठिकाणी चोख व्यवस्था रथयात्रेच्या मार्गावर भाविकांच्या सोयीसाठी ठिकठिकाणी फराळ (प्रसाद) आणि दूध वाटपाची व्यवस्था करण्यात आली आहे.

# वसईतील कोळीवाड्यांना गावठाणाचा दर्जा

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

***मुंबई*** – वसई तालुक्यातील कोळीवाड्यांना अधिकृत गावठाणचा दर्जा देण्यासह तेथील नागरिकांचे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले प्रश्न कायमचे सोडविण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

या पार्श्वभूमीवर, येथील कोळीवाड्यांना गावठाण दर्जा देण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करावी, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.



वसईतील कोळीवाड्यांच्या प्रश्नावर बावनकुळे यांनी बुधवारी बैठक घेतली. यावेळी कोळीवाडा आणि गावठाण परिसरातील रहिवाशांना मोठा दिलासा देणारे निर्णय घेण्यात आले. १ जानेवारी २०११ पूर्वीची १५०० चौरस फुटांपर्यंतची निवासी बांधकामे नियमित करण्यात यावीत. मात्र, या निश्चित केलेल्या मुदतीनंतर झालेली अनधिकृत अतिक्रमणे तातडीने निष्कासित करावीत, अशा सूचना बावनकुळे यांनी केल्या. गावठाण तसेच कोळीवाड्यातील रहिवाशांना त्यांच्या हक्काच्या घरांची मालकी मिळवून देण्यासाठी तिथल्या घरांखालील जमिनी संबंधित रहिवाशांच्या नावे करण्याबाबत सकारात्मक पावले उचलली जातील.

ज्या स्थानिक रहिवाशांच्या जमिनींचा मालकी हक्क सध्या मुंबई पोर्ट ट्रस्टकडे आहे, अशा प्रॉपर्टीचा सविस्तर अभ्यास करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. या जमिनींबाबतचा प्रश्न सोडवण्यासाठी लवकरच पोर्ट ट्रस्टच्या प्रशासनासोबत स्वतंत्र बैठक घेऊन योग्य तो तोडगा काढला जाईल, अशी हमीही बावनकुळे यांनी यावेळी दिली.

या बैठकीला आमदार स्नेहा दुबे -पंडित तर पालघरच्या जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**कोळीवाड्यांचे योग्य सीमांकन करण्याचे निर्देश**

अनेक कोळीवाड्यांच्या सीमांची स्पष्ट नोंद नसल्याने अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होतात, यावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. या अडचणी दूर करण्यासाठी गावठाण घोषित करण्यापूर्वी संबंधित कोळीवाड्यांचे योग्य सीमांकन करून भूमी अभिलेख विभागामार्फत त्यांची तातडीने मोजणी करण्यात यावी, असे निर्देश महसूल मंत्र्यांनी दिले.

# जन्मदाखल्यात बदल करण्याचा पालिकेला अधिकार

**विश्वासार्ह पुराव्यांची आवश्यकता - हायकोर्ट**

*(प्रतिनिधी वरूड दर्पण)*




**मुंबई** – मुलाच्या अथवा मुलीच्या जन्म दाखल्यातील नोंद चुकीची असल्याचे विश्वासार्ह पुराव्यांद्वारे सिद्ध झाल्यास ती दुरुस्त करण्याचा अधिकार पालिका प्रशासनाला आहे, असा महत्त्वपूर्ण निवाळा हायकोर्टाने दिला. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे व न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठाने हा निवाळा देताना एका अल्पवयीन मुलीच्या जन्मदाखल्यातील वडिलांचे नाव बदलून तिच्या जैविक वडिलांचे नाव नोंदविण्याचे आदेश मुंबई महापालिकेला दिले. याचिकाकर्त्या महिलेचे २००६ मध्ये पहिले लग्न झाले होते. मात्र काही काळाने पती-पत्नीमध्ये मतभेद झाल्यामुळे ते वेगळे राहू लागले. दरम्यानच्या काळात महिलेचे दुसऱ्या एका व्यक्तीसोबत संबंध निर्माण झाले आणि २००९ मध्ये तिने एका मुलीला जन्म दिला.

# भाजपला पाठिंब्याचे वृत निराधार : सुप्रिया सुळे

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – केंद्र सरकारच्या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून पाठिंबा दिला जाणार असल्याचे वृत्त निराधार असल्याचा खुलासा पक्षाच्या खासदार



सुप्रिया सुळे यांनी बुधवारी येथे केला. या विधेयकाबाबत पक्षाने अद्याप अधिकृत भूमिका घेतली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रवादी शरद पवार गट भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागी होणार असल्याची आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला पाठिंबा देणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून माध्यमांमध्ये आहे. या पार्श्वभूमीवर आज पत्रकार परिषदेत बोलताना सुळे यांनी या चर्चा फेटाळून लावल्या. मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाचा नवीन मसुदा अद्याप आमच्याकडे आलेला नाही.

# एकनाथ शिंदे यांनी घेतली शहांची भेट

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**नवी दिल्ली** – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातून शिंदेसेनेत (शिवसेना) दाखल झालेल्या ६ खासदारांसह राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या सदिच्छा भेटीनंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत त्या ५० मिनिटांच्या मॅरेथॉन बैठकीची माहिती दिली. यावेळी त्यांनी मंत्रिमंडळ विस्तार, महिला आरक्षण आणि खासदार संजय राऊत यांच्या टीकेवर अत्यंत सडेतोड उत्तरे दिली.



नुकतेच ठाकरे गटाचे ६ खासदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत सामील झाले आहेत. या प्रवेशानंतर, आगामी पावसाळी अधिवेशनाच्या तोंडावर शिंदे आणि या ६ खासदारांनी घेतलेली अमित शहा यांची भेट अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. या बैठकीत केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तार आणि आगामी राजकीय रणनीतीवर चर्चा होण्याची शक्यता वर्तवली जात होती. याच सर्व पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती दिली.

खासदारांच्या मतदारसंघातील विकासकामांवर चर्चा अमित शहा यांच्यासोबतच्या बैठकीत केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराबाबत कोणतीही राजकीय चर्चा झाली नसल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. ही बैठक केवळ खासदारांच्या मतदारसंघातील विकासकामांवर केंद्रित होती.

# ४८ हजार कोटींची थकीत कृषीपंप विज बिल पुर्णपणे माफ

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या पाठपुराव्याला यश**

**वरुड** – युती सरकारने शेतकऱ्यांसाठी ४८ हजार कोटींची थकीत कृषीपंप विज बिल पुर्णपणे माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे लाखो शेतकरी कुटुंबाना मोठा दिलासा मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी वरुड मोर्शी मतदार संघाचे आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश प्राप्त झाले आहे.

प्राप्त माहितीनुसार, शेतकऱ्यांची थकीत कृषीपंप विज बिल पुर्णपणे माफ करण्यासाठी सन २०२६ च्या पावसाळी अधिवेशनात आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी सभागृहात मागणी करुन सरकारचे लक्ष वेधले होते. राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हितार्थ शेती पंपाच्या विजबिला संदर्भात विचारधीन राहुन सन २०२४ ते २०२९ पर्यंत या ५ वर्षांसाठी माफी देण्याचा घेतलेला निर्णय हा स्वागतार्ह व कौतुकास्पद आहे.



या निर्णयामुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळालेला आहे. परंतु यापुर्वी अनेक शेतकऱ्यांकडे प्रलंबित (जुन्या) शेती पंपाचे विज बिल थकित आहे. सदर थकबाकीमुळे शेतकऱ्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असुन विशेषतः नविन वीज जोडणी, पंप संचालन, नविन सौर उर्जा पंप तसेच शेतीची विक्री करायची असल्यास जुन्या विज बिल थकबाकीमुळे अडथळे निर्माण होत आहे.

त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्याची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक असुन नैसर्गिक आपत्ती, उत्पादन खर्च आणि उत्पन्नतील अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. अशा परिस्थितीत प्रलंबित (जुन्या) थकित वीज बिलाची रक्कम भरणे शेतकऱ्यांसाठी अत्यंत कठीण आहे. याकरिता शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करुन थकित वीज बिलाची रक्कम माफ करण्याकरीता संबंधित विभागाला आदेशित करण्यात यावे तसेच बळीराजाला या संकटातुन बाहेर काढण्यासाठी शेतकऱ्यांचे प्रलंबित विज बिल पुर्णपणे माफ करण्यात यावे अशी मागणी उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी सभागृहात केली होती. याबाबत ११ जुलै रोजी त्यांच्याकडुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रव्यवहार सुद्धा करण्यात आला होता. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ४८ हजार कोटींची ऐतिहासिक घोषणा केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कृषीपंपाचे थकीत विजबील आता माफ होणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबाना दिलासा मिळणार असल्याने शेतकऱ्यांकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारचे व उमेश उर्फ चंदु यावलकर यांचे आभार मानले जात आहे.

# ट्रेझरी ऑफिस परिसरातून दुचाकीची चोरी

**अज्ञात चोरटयाविरुद्ध गुन्हा दाखल**

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**वरुड** – शहरातील ट्रेझरी ऑफिस परिसरातून एक दुचाकी चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी वरुड पोलिसांनी अज्ञात चोरटयाविरुद्ध गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील लक्ष्मी नगर येथील रहिवासी संदीप चंद्रभान कुरवाडे (४८) हे गेल्या १ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान वरुड येथील आवठडी बाजारात खरेदी करण्यासाठी आले होते. त्यांनी त्यांच्या मालकीची हिरो होंडा मोटारसायकल किंमत अंदाजे १५ हजार रुपये ट्रेझरी ऑफिस जवळील




एका दुकानासमोर पार्क केली होती. ते बाजारात गेले असताना, कोणीतरी अज्ञात चोराने संधी साधून त्यांची दुचाकी चोरुन नेली. सर्वत्र शोध घेऊनही दुचाकी मिळून न आल्याने अखेर त्यांनी पोलिसांत धाव घेतली. याप्रकरणी फिर्यादी संदीप कुरवाडे यांच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध कलम ३०३ (२) गुन्हा दाखल केला आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत.

# विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ : पतीसह चौघांविरुध्द गुन्हा दाखल

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**शेंदुरजनाघाट** – परतवाडा येथील गुप्ता नगर, कांडली परिसरात एका २८ वर्षीय विवाहितेचा तिच्या पती आणि सासरच्या मंडळींकडून शारीरिक व मानसिक छळ केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरुन पोलिसांनी पतीसह एकूण ४ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंकिता संकेत चिंचमलातपुरे (२८), रा.गुप्ता नगर कांडली, परतवाडा, ह.मु. पुसला असे छळ झालेल्या विवाहितेचे नाव आहे. या प्रकरणी तिने दिलेल्या जबानी रिपोर्टवरुन पोलिसांनी आरोपी पती संकेत प्रमोद चिंचमलातपुरे, सविता प्रमोद चिंचमलातपुरे, अंकित प्रमोद चिंचमलातपुरे तिन्ही रा.कांडली परतवाडा आणि दिपक धरमठोक रा.शेंदूरजनाघाट यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

नमूद आरोपींनी आपापसात संगनमत करुन पीडित विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केला तसेच तिला अश्लिल शिविगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. या त्रासाला कंटाळुन अखेर पीडितेने पोलिसात धाव घेतली.

शे.घाट पोलिसांनी या प्रकरणी कलम ८५, ३५२, ३५१ (२), ३ (५) गुन्हा दाखल केला असून पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## भावली धरणावर तरुणीची छेड, कारवर लटकत कुटुंबावर हल्ला

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**नाशिक** – जिल्ह्यातील इगतपुरी येथील प्रसिद्ध भावली धरण परिसरात पर्यटकांच्या कुटुंबावर झालेल्या अमानुष आणि थरारक हल्ला प्रकरणातील अटक करण्यात आलेल्या टवाळखोर आरोपींना न्यायालयाने १८ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणातील एका आरोपीचा धावत्या गाडीला लटकून हल्ला करण्याचा आणि महामार्गावर पडल्याचा थरारक व्हिडीओ समोर आल्यानंतर राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर आरोपींना न्यायालयात हजर केले असता, सरकारी वकील आणि आरोपींच्या वकिलांमध्ये जोरदार युक्तिवाद झाला.

# क्षुल्लक कारणावरुन तरुणावर दगडाने हल्ला

**एक जखमी : गुन्हा दाखल**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**बेनोडा** – तालुक्यातील बेनोडा (शहीद) येथील पेठपुरा येथे क्षुल्लक कारणावरुन एका २५ वर्षीय तरुणावर दगडाने जीवघेणा हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून, बेनोडा पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पेठपुरा येथील रहिवासी अजय सदानंद भलावी (२०) हा गेल्या १३ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास गावातच राहणारे अजय धुर्वे यांच्या घराजवळ बोलत उभा होता. याच दरम्यान, गावातीलच रहिवासी असलेला आरोपी राजेंद्र मधुकरराव कुमरे (२५) हा दारुच्या नशेत तेथे आला आणि विनाकारण शिवीगाळ करु लागला. फिर्यादी अजय भलावी याने त्याला शिवीगाळ न करण्याबाबत हटकले. याचा राग मनात धरुन आरोपी राजेंद्र कुमरे याने




रस्त्यावर पडलेला दगड हातात घेतला आणि अजयच्या डोक्यावर उजव्या बाजूने जोरात मारला. या हल्ल्यात अजयच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

घटनेनंतर जखमी अजय भलावी याला वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयातील मेडिकल रिपोर्ट आणि फिर्यादीच्या जबानी वरुन बेनोडा पोलिसांनी आरोपी राजेंद्र कुमरे विरुद्ध कलम ११८, १-ब आणि ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.





